**पद्यपाठ १०**
**रापी- आनंद गायकवाड**
**ठळक मुद्दे-**

- **कवितेचे नावं-** रापी
- **कवी** –आनंद गायकवाड
- **कवितेचा प्रकार-**गद्यकाव्य
- **कवितेचा आशय** –मोठ्या उद्योगधंद्यामुळे छोट्या कारागिरांचे होणारे नुकसान,जातीव्यवस्थेमुळे जुन्या पिढीची असहाय्यता व या प्रश्नांना उत्तरे शोधु पाहणारी नवी पिढी.
- **कवितेचे विचार सौंदर्य-**जन्मल्यापासून चिकटलेली जात,नव्याचा स्वीकार यासाठी वापरलेली अर्थपूर्ण प्रतिके
- **कविताचां शोध-**पूरक वाचनासाठी समांतर आशयाच्या कविता-
- **उपक्रम-**निबंधलेखन

**प्रस्तावना**
एक शाळेत जाणारी मुलगी आणि तिचे वडील यांचा त्यांचा बोलीभाषेतला संवाद असे या कवितेचे स्वरूप आहे.बोली भाषेतील अपरिचित शब्दांचा अर्थ पाठयपुस्तकात दिलेला आहे. त्याची मदत घेवून हा संवाद प्रथम तुझ्या भाषेत लिहून काढ आणि मग ही कविता ऐक व वाच.

रापी

मच्छीखाया पुल

पुलखले नाला

नाला किनारे घर नां तोरो ?

रोज मच्छीभात खात होबे

मास्तर पुछे बापू

इस्कुल मे,

तू मच्छी लास कां नही बापू ?

टुरी

धंदा अपनो चले नही

टायर की चप्पल कोई ले नही

जिते उते लखणी बाटा

करके आपनो घाटा

बापू ?

अपने को बाटा होता आये नही कां ?

टुरी

जरू जसी चिपकी है जात

ओको कसो काटता आये ?

पागल रे बापू तू

अरे,तब रापी कोन्ते कामकी ?

**कविता समजून घेऊ या:-**

एक शाळेत जाणारी मुलगी आणि तिचे वडील यांचा त्यांच्या बोलीभाषेतला संवाद असे या कवितेचे स्वरूप आहे.बोली भाषेतील अपरिचित शब्दांचा अर्थ पाठयपुस्तकात दिलेला आहे. त्याची मदत घेऊन हा संवाद प्रथम तुझ्या भाषेत लिहून काढ.

गद्य मजकूर लिहिताना कोणाच्या तरी तोंडचे संवाद आपण दुहेरी अवतरण चिन्हात घालतो.या अवतरण चिन्हामुळे वाचणा-याला कळते की ही त्या व्यक्तीने बोललेली वाक्य आहेत . कविता लिहिताना कधी कधी व्याकरणाचे ,विरामचिन्हांचे नियम पाळले जात नाहीत. या कवितेतही शिक्षक ,मुलगी आणि बाप यांचे बोलणे विरामचिन्हे न वापरता दिले आहे.तरीही कोणते वाक्य कुणाच्या तोडंचे आहे हे तुला ओळखता येईल.ते ओळख आणि त्याला संवादस्वरुपात नोंदवून ठेव.

आता पुढील प्रश्नांची उत्तरे कवितेच्या आधारे तुला देता येतील .त्या उत्तरांचा शोध घेताघेता ही कविता आपल्याला समजलीये याची खात्री पटेल.

शिक्षकांनी मुलीला काय विचारले ?

मच्छीखाया नावाच्या पुलाखाली जो नाला आहे त्याच्याजवळ आहे ना ग घर तुझ?मग रोज मच्छीभात खात असशील तू?

मुलीने वडिलांना कोणता प्रश्न विचारला ?

तू मासे का नाही आणत ,बापू?

त्यावर वडिलांनी काय उत्तर दिले ?

पोरी आपला धंदा नाही चालत.टायरची चप्पल आता कोणी घेत नाही.जिकडे तिकडे बाटा आणि लखाणी आलाय.त्या बाटामुळे आपला तोटा होतोय.
या उत्तरावर मुलीने कोणती प्रतिक्रिया दिली आहे ?

आपल्याला 'बाटा' नाही होता येणार का ?

'बाटा' न होता येण्याचे कोणते कारण वडिलांनी दिले आहे?

आपली जात (चांभाराची) आपल्याला जळू सारखी चिकटली आहे.तिला कसं कापता येईल?

यावर मुलीचे म्हणणे काय आहे ?

वेडा आहेस रे बापू तू......आपल्याकडच्या रापीचं काम काय मग?

**कवितेचा भावार्थ:-**

या कवितेतील बापलेकीची प्रश्नोत्तरे वाचत असताना आपल्याला त्या शब्दांच्या पलीकडचे खूप काही दिसायला लागते.शिक्षकांनी सहजपणे मुलीला विचारलेला प्रश्न पण त्यामुळे मुलीच्या मनात आपल्याला मासे खायला मिळत नाहीत यांची खंत आणि ते खाण्याची इच्छा या दोन्ही गोष्टी तिने वडिलांना विचारलेल्या प्रश्नांमधून कळतात.

वडिलांनी तिला दिलेल्या छोट्याश्याच उत्तरातून आपल्याला किती गोष्टी लक्षात येतात बघ-

१)त्यांचा चप्पला बनवण्याचा व्यवसाय आहे.

२)तो आता चालत नाही

३) जिकडे तिकडे बाटा आणि लखाणी कंपनीच्या चपला आल्या आहेत.लोकांना त्याच हव्या असतात

४)या मोठमोठ्या कंपन्यामुळे त्यांचा छोटा व्यवसाय बुडाला आहे याचे उत्तर म्हणून मुलीने वडिलांना एक प्रश्नच विचारला आहे –

'आपल्याला 'बाटा' होता येणार नाही का ? ' यातून आपली समस्या सोडवण्याचा एक व्यवहार्य विचार मुलगी करते हे आपल्याला कळते शिवाय दोन पिढ्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीतला फरक ही कळतो. पुढे वडिलांनी दिलेल्या दोनच ओळींच्या उत्तरातून आपल्या समाजातील जाती व्यवस्थेबाबतची परिस्थिती आपल्या डोळयासमोर येते.वडिलांना जात 'जळु' सारखी वाटते.जळु कोणत्याही प्राण्यांच्या शरीराला एकदा चिकटली की रक्त शोषत राहते.तिला सहजासहजी बाजूला काढता येत नाही.परंपारेनं चिकटलेली जात वडिलांना जळु सारखी वाटते.ती त्रासदायक आहे तरीही सहजी वेगळी करता येत नाही अशी.

मुलीच्या मनात मात्र आशा आहे.आपल्याजवळ चामडे कापाण्यासाठी असलेल्या हत्याराचा 'रापीचा' उपयोग करून जात का नाही कापायची ? असा प्रश्न ती वडिलांना विचारते.

आपल्या समस्या सोडवण्याची इच्छा मुळात आपल्याला हवी.ती तीव्र असेल तर त्यासाठीची हत्यारे,साधने आपल्याजवळच असतात. ती ओळखावी आणि वापरावी लागतात.हा संदेश मुलीने विचारलेल्या कवितेतील शेवटच्या प्रश्नातून आपल्याला मिळतो.हेच या कवितेचे विचार सैंदर्य आहे.

बोली भाषेमुळे विचारांना जिवंतपणा आला आहे.संवादामुळे त्यातील नाट्यमयता वाढली आहे.तो प्रसंग डोळयापुढे उभे राहण्याची ताकत संवादात आहे.

**उजळणी प्रश्न**

**प्रश्न १-पुढील प्रश्नाची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा.**

१)या कवितेतील 'बापू' चा परंपरागत व्यवसाय कोणता आहे ? आणि त्याबाबतची कोणती वस्तुस्थिती या कवितेतून आपल्याला समजते.

२)"जरू जसी चिपकी है जाता " असे बापू का म्हणतो?

**प्रश्न २-पुढील पदयपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) अपने को बाटा होता आये नही कां ?

२) पागल रे बापू तू

अरे,तब रापी कोन्ते कामकी ?

**प्रश्न ३-पुढील ओळीमध्ये कोणता भाषिक अलंकार आहे ते लिहा.**

१) "जरू जसी चिपकी है जाता "

**प्रश्न ४-या कवितेत आलेल्या पुढील प्रतीकांमधून कवीला काय सूचित करायचे आहे ?**

१)बाटा

२)जळू

३)रापी

**मुक्त प्रश्न**

१)मोठ्या कंपन्यांनी बनवलेल्या वस्तू बाजारात आल्यामुळे छोट्या कारागिरांचा धंदा बुडतो.यांची तुमच्या परीसरतील आणखी काही उदाहरणे लिही

२) राम दोतोंडे यांची 'विसरू नकोस 'ही कविता आपण यापूर्वी समजून घेतली आहे.यात नवे बदल स्वीकारता न आल्याने 'पायाखाली पडलेली फुले' अशी बापुची अवस्था आहे.ही कल्पना तुझ्या शब्दांत स्पष्ट करून लिही.